पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

प्रथम मान्यता (अहवाल) 04

पुणे जिल्हा परिषद , पुणे
शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भवन, 1 वेलस्ली रोड कॅम्प, पुणे 411 001
ई मेल punezpprivate@gmail.com
वेबसाईट https: / /punezp.mkcl.org

जा.क्र.जि.प.शिक्षण / प्राथ / खाप्राशा1 / 1053/2024 / 386

दिनांक - 31-12-2024
16/01/2025

प्रति,
श्री. शब्बीर शेख,
विस्तार अधिकारी (शिक्षण), जि. प. पुणे

विषय :- प्रथम मान्यता इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी चे प्रस्ताव पडताळणी करून पाठवणेबाबत.

संदर्भ :- 1. शासन निर्णय एसएफएस-1021/प्र.क्र. 450/एसएम-2,दिनांक 04/03/2024

2.शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ204/ज रा कु/मान्यता/पुवि/2024/3768, दिनांक 20/03/2024

संदर्भिय विषयांन्वये प्रथम मान्यता प्रमाणपत्र देणेसाठी प्राथमिक /माध्यमिक शाळेने खालील शाळेचा विहित नमुन्यातील प्रथम मान्यता प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव - | कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंढवा, पुणे |
| शाळेचे नाव व पत्ता - | माय कल्याणी इंटरनॅशनल स्कुल , गट क्र. 1429, मौजे वाघोली, ता. हवेली, जि. पुणे |
| UDISE NO - | 27254100020 |
| प्रस्ताव प्राप्त दिनांक - | 23-12-2024 |

संदर्भिय विषयानुसार आपण समक्ष उक्त शाळेस भेट देऊन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 मधील तरतुदीनुसार आवश्यक भौतिक सुविधा व कागदपत्रे परीपुर्ती बाबत पडताळणी करावेत आणि विहित नमुन्यामध्ये अहवाल सादर करावेत. प्रस्तावासोबत दिलेल्या चेकलिस्टप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त बार्बीचा विचार करता वर नमुद केलेल्या शाळेने मागणी केलेल्या इयत्तासाठी व नमुद केलेल्या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम मान्यता तपासणी करताना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

1) वरील शाळेस आपण स्वतः शाळांना समक्ष भेट देऊन भौतिक सुविधांची पडताळणी व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन प्रस्ताव पृष्ठांकनासह या कार्यालयास सादर करण्यात यावा.
2) शाळेस अधिकारी यांनी भेट दिल्यावर 10 भौतिक सुविधा मानके व प्रमाणकांचे Geo Tagging फोटो काढून प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य असेल.त्या फोटोमध्ये भौतिक सुविधा, भेट देणारे अधिकारी व.शाळेचे मुख्याध्यापक यांचा समावेश असावा व भौतिक सुविधा स्पष्टपणे दिसतील असे फोटो असावेत.
3) स्थळ पाहणी अहवालावर आपली स्वयंस्पष्ट शिफारस आवश्यक राहील.अटी व शर्तीसह शिफारस देऊ नये. स्थळ पाहणी अहवालात खाडाखोड असू नये,व्हाईटनरचा वापर असू नये, स्थळ पाहणी अहवालावर तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी असावी.
4) शाळा मान्यता दिलेल्या ठिकाणी भरविली जात नसेल,अनधिकृत शाळा अथवा अनधिकृत वर्ग सुरु असतील, भौतिक सुविधा निकष पूर्ण न होणाऱ्या शाळा असतील तर अशा शाळांच्या बाबतीत **प्रथम मान्यता** देण्याची शिफारस केल्यास अशा प्रकरणी संपूर्ण जबाबदारी आपली राहील. तसेच सदरची बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणण्यात येईल.
5) या पत्रातील QR CODE स्कॅन करून तपासणी नमुना प्राप्त करून घ्यावा.आपणाकडे प्रस्ताव तपासणीसाठी दिल्यानंतर तपासून तात्काळ या कार्यालयाकडे आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पाठवण्यात यावेत.

सोबत:- 1 . उक्त शाळेचा मूळ प्रस्ताव

(संजय नाईकडे)
शिक्षणाधिकारी प्राथमिक
पुणे जिल्हा परिषद पुणे

Principal
Kalyani International School
Wagholi

प्रत- मुख्याध्यापक माय कल्याणी इंटरनॅशनल स्कुल